# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुवाडी **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0065 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/02/2019 01:55 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 31/01/2019
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/01/2019
**Time From (वेळेपासून):** 17:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/02/2019 **Time (वेळ):** 01:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/02/2019 01:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 03 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वनिता निवासाचे समोर रोडवर सोमव,मलकापूर येथील ओकोली पणुद्रे त, तलाठी कार्यालय व मलकापूर हायस, पाठीमागे ताशाहुवाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. विठ्ठल आबा खुटाळे
(b) **Father's Name (वडील का नाव) :** आबा खुटाळे
(c) **Date/Year of Birth (जन्म** 1978 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | डोणोली,शाहुवाडी,शाहुवाडी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | डोणोली,शाहुवाडी,शाहुवाडी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विनोद आप्पासाहेब कांबळे | | वडील का नाम : आप्पासाहेब कांबळे | 1. येळाणे,शाहुवाडी,शाहुवाडी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची मागणीरुपये 5000/ | 5,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 5,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्यादी जबाब दिनांक- 01/02/2019 मी विठ्ठल आबा खुटाळे, वय-41, रा.डोणोली, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर आज रोजी समक्ष फिर्याद देतो की, मी वरील माझे पत्त्यावर माझे कुटूंबासह रहाणेस आहे. माण व डोणोली गावी आमची षेती असुन मी षेती व्यवसाय करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो आहे. माझी मेव्हणी श्रीमती वंदना सुनिल चव्हाण रा.बहिरेवाडी ता.पन्हाळा जि.कोल्हापूर येथे रहाणेस असते. तिचे पती सुनिल चव्हाण हे मयत झाले असलेने तिचे ब-यापैकी व्यवहार मी पहात असतो. मेव्हणी वंदना चव्हाण यांना पणुंद्रे गावी जमीन खरेदी करणेची असलेने जमीनीचा आम्ही षोध घेतला असता पणुंद्रे गावी गट नंबर 245 येथील मारुती हरी उकिर्डे यांची 41 गुंठे व धोंडीबा ज्ञानु देसाई ,पांडुरंग ज्ञानु देसाई यांचे मालकीची 41 गुंठे जमीन विक्री करावयाची असलेची माहिती मिळाली.त्यानुसार आम्ही त्यांचेषी बोलणी करुन आमचेत खरेदी व्यवहार ठरला. परंतु, धोंडीबा देसाई व पांडुरंग देसाई यांचे मालकीचे जमीनीवर गावचे विकास सेवा सोसायटीचा बोजा 7/12 उता-यावर नोंद असलेने संबंधीत सोसायटी कडुन बोजा कमी करणेचे पत्र आम्ही घेवुन 7/12 उतारा-यावरील संबंधा ीत सोसायटीचा बोजा कमी करणे करीता पणुंद्रे गावचे तलाठी विनोद कांबळे यांची सुमारे 2 महिण्यापुर्वी भेट घेवुन बोजा कमी करणेचा अर्ज दिला. त्यावेळी तलाठी कांबळे यांनी त्याची पोहोच न देता बोजा कमी करुन देतो असे सांगीतले होते.त्यानंतर मेव्हणी वंदना चव्हाण हिने वरील जमीनीचा खरेदी व्यवहार दुयम निबंधक कार्यालय षाहुवाडी येथे पुर्ण केला त्या व्यवहारा मध्ये मी व माझी पत्नी सौ.मुक्ता विठ्ठल खुटाळे असे दोघेजन साक्षीदार आहोत. त्यानंतर मेव्हणी श्रीमती वंदना सुनिल चव्हाण हिने खरेदी केलेल्या जमीनीचे 7/12 पत्रकी तिचे नाव नोंदविणे करीता तिचा अर्ज व कागदपत्रे घेवुन मी तलाठी विनोद कांबळे यांची भेट घेवुन त्यांना वर्दीअर्जा सोबत खरेदीपत्र जोडुन दिले होते त्याचीही तलाठी कांबळे यांनी पोहोच दिली नाही. मागील 4/5 दिवसापासुन मी तलाठी कांबळे यांची भेट घेवुन आमचे कामा बाबत विचारणा करीत आहे. मंगळवार दिनांक 29.1.2019 रे ाजी मी तलाठी कांबळे यांना भेटलो असता त्यांनी पुर्वीचा बोजा कमी करणेसाठी व मेव्हणीचे नाव 7/12 पत्रकी लावणेसाठी माझेकडे 5000 रुपये मागणी केलेने मी तलाठी विनोद कांबळे यांचेविरूध्द कारवाई होणेसाठी दि. 31/01/2019 रोजी अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर येथे समक्ष हजर राहुन लेखी तक्रार दिली.माझे तक्रारीचे अनुषंगाने दि. 31/01/2019 रोजी सापळा कारवाई करणेकरीता पोलीस निरीक्षक पाटील, अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर यांनी मा.अधीक्षक अभियंता, महावितरण कार्यालय, कोल्हापूर यांचे कार्यालयांषी पत्रव्यवहार करुन गोपनीय कामाकरीता पंच मागणी करुन दोन पंच उपलब्ध करुन घेतले. त्यांचे पत्रान्वये हजर झालेल्या दोन्ही पंचाची माझी तसेच सोबत असलेल्या सापळा पथकातील अधिकारी/कर्मचा-यांची आपापसात ओळख व परिचय करुन दिला व माझी ओळख करुन घेतली. त्यानंतर सोबत हजर असले दोन्ही पंचांना पोनि पाटील यांनी गोपनिय कामकाजा करीता पंच म्हणून काम करण्यास तयार आहात काय? अषी विचारणा केली असता, त्यास दोन्ही पंचांनी संमती दर्षविली. त्यानंतर पोनि पाटील यांनी मला माझी तक्रार पंचाचे समक्ष कथन करण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचाचे समक्ष

कथन करुन मी दिलेला तक्रारी अर्ज पोनि पाटील यांनी माझेसमक्ष पंचाना वाचण्यास दिला. तो लेखी तक्रारी अर्ज पंचानी वाचून पाहिला. त्यावेळी मी तोंडी सांगितलेली तक्रार व लेखी दिलेली तक्रार ही एकच असल्याची खात्री केल्यानंतर त्या तक्रारी अर्जावर पोनि.पाटील यांनी व पंचानी सह्या केल्या. त्यानंतर माझे तक्रारीचे अनुशंगाने सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी, दोन्ही पंच असे सापळा कारवाईकामीं लागणारे साहित्यासह होंडा अमेझ गाडी नं. एमएच 09 ईयु 7335 व मारूती रिड्झ गाडी नं. एमएच 09 डीएक्स 3153 या दोन खाजगी चारचाकी वाहनांसह व मी माझेकडील स्वीफ्ट डिझायर गाडी नं. एमएच 46 झेड 7459 या चारचाकी गाडीने पेरीड नाका, मलकापूर ता. षाहुवाडी येथे येवुन थांबलो. त्यांनतर पोनि.पाटील यांनी मला माझे तक्रारीचे अनुशंगाने तलाठी कार्यालय, सोमवार पेठ, मलकापूर या ठिकाणी पंच नं.1 कांबळे यांचे सोबत माझे चारचाकी वाहनाने पाठवून देवून तलाठी विनोद कांबळे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची प्रथम पडताळणी करणार असलेचे सांगीतले. तसेच मला पंचासमक्ष डिजीटल रेकार्डर चालू-बंद करणेचे प्रात्यक्षिक दाखविले व मला ते समजलेची खात्री केली. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री.कांबळे यांना पडताळणी पंचानाम्याबाबतच्या सुचना दिल्या. माझे गळयामध्ये डिजीटल व्हाईस रेकार्डर अडकविला व चालु करुन माझेसोबत पंच नं.1 यांना तलाठी कांबळे यांची भेट घेण्यासाठी माझे चारचाकी वाहनाने तलाठी कार्यालयाकडे पाठविले. तलाठी कार्यालयामध्ये पोहचलो असता तेथे लोकांची वर्दळ होती. गर्दी कमी होईपर्यंत आम्ही तिथेच थांबुन राहिलो. त्यानंतर काही वेळाने गर्दी कमी झालेवर माझे व तलाठी कांबळे यांचे बोलणे झाले. त्यामध्ये त्यांची व माझी माझे कामाबाबत चर्चा होवुन त्यांनी पंच नं.1 कांबळे यांचेसमक्ष माझेकडे माझ्या मेव्हणीने खरेदी केलेल्या जमिनीचे 7/12 पत्रकातील मुळ मालकांने घेतलेल्या कर्जाचा बोजा कमी करणे व मालकी हक्कामध्ये माझी मेव्हणी श्रीमती वंदना हिचे नाव नोंद करून नवीन 7/12 उतारा देणेसाठी रुपये 5000/- लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर पोनि.पाटील यांचे सुचनेप्रमाणे मी सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी थांबले ठिकाणी परत गेलो. त्यावेळी पोनि.पाटील यांनी माझे गळयामध्ये अडकविलेला डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला.त्यानंतर आपण पंच नं.1 यांचेकडे विचारपूस केली. त्यानंतर आपण पंच नं.1 यांचेकडे विचारपूस झालेवर आपण माझ्याकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली. त्यानंतर पोनि. पाटील यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यामधील ध्वनीमुद्रीत झालेले लाच मागणी संदर्भातील संभाशण ऐकले असता, त्यामध्ये माझेत व तलाठी कांबळे यांचेत लाचेच्या मागणी संदर्भात झालेले संभाशण ध्वनिमुद्रीत झाले होते. माझे व पंच नं. 1 यांचे सांगणेवरून तसेच डिजीटल व्हाईस रेकार्डर मधील ऐकलेल्या ध्वनिमुद्रीत संभाशणावरुन तलाठी कांबळे यांनी माझेकडे माझ्या मेव्हणीने खरेदी केलेल्या जमिनीचे 7/12 पत्रकातील मुळ मालकांने घेतलेल्या कर्जाचा बोजा कमी करणे व मालकी हक्कामध्ये माझी मेव्हणी श्रीमती वंदना यांचे नाव नोंद करून नवीन 7/12 उतारा देणेसाठी रुपये 5000/- लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितलेचे पोनि पाटील व सोबतच्या स्टाफला त्यांनी केलेल्या पडताळणीमध्ये निश्पन्न झाले.त्याप्रमाणे पोनि.पाटील व स्टाफने मलकापूर येथील सोमवार पेठ गल्लीतील तलाठी कार्यालयामध्ये तलाठी कांबळे यांच्याविरुध्द सापळा कारवाई करणेचे आयोजित केले. त्यावेळी पोनि पाटील यांनी मला व पंचाना त्यांचे खाजगी होंडा अमेझ गाडी नं. एम एच 09 ई यु 7335 मध्ये सापळापुर्व पंचनाम्याचे महत्व सांगून सापळापुर्व पंचनामा सूरु केला. त्यावेळी त्यांनी मला व पंचाना अल्ट्राव्हायोलेट दिवा व अंथ्ुरासिन पावडरचे गुणधर्म व महत्व समजावून सांगितले. त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा असे एकुण रुपये 5000/- लाच रक्कमेतील नोटांचे नंबर को-या कागदावर लिहुन तो कागद पंच नं. 2 रूकडे यांचेकडे देवुन, नोटांचे दोन्ही बाजूस सफौ.शाम बुचडे यांनी हाताच्या बोटाने अंथ्रासिन पावडर लावली आणि त्या चलनी नोटा माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर पोनि पाटील यांनी सापळा कारवाईबाबत मला, पंच व त्यांचेसोबतचे कर्मचारी यांना योग्य त्या सुचना देवून लागलीच सोमवार पेठ गल्लीतील तलाठी कार्यालय येथे सापळा कारवाईचे आयोजन केले. त्या अनुशंगाने त्यांनी मला व पंच नं. 1 यांना सापळा कारवाईबाबत पुन्हा योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरु करुन तो माझ्या गळयात षर्टचे आतील बाजुस कोणास दिसणार नाही अशा रितीने चालू करून अडकविला व मला पंच नं. 1 यांचेसोबत तलाठी कांबळे यांची भेट घेण्यासाठी पाठविले. त्यानुसार मी तलाठी कांबळे यांची पंच नं. 1 कांबळे यांचे सोबत भेट घेतली असता, तलाठी कांबळे यांनी माझेकडे 5000/- रूपये लाचेची रक्कम मागणी केली. त्यावेळी मी ती लाच रक्कम माझे षर्टच्या डाव्या बाजुच्या खिषातून उजव्या हाताने काढून तलाठी कांबळे यांचे समोर धरली असता त्यांनी आपल्या उजव्या हाताने स्विकारुन आपल्या षर्टच्या डाव्या बाजुच्या खिषात ठवेली. त्यावेळी मी पोनि.पाटील यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणे तलाठी कांबळे यांनी लाच रक्कम स्विकारलेचा इशारा केलेवर पोनि.पाटील व स्टाफ हे आम्ही उभारले ठिकाणी येवुन तलाठी कांबळे यांना पकडले. त्यावेळी पोनि.पाटील यांनी माझे गळयातील डिजीटल व्हाईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला. तसेच तलाठी कांबळे यांनी स्विकारलेली लाच रक्कम रुपये 5000/- पंच साक्षीदारांचे समक्ष जप्त करुन दि. 31/01/2019 रोजी ताब्यात घेतली. सदर कारवाईमध्ये तलाठी विनोद कांबळे यांनी माझेकडे माझ्या मेव्हणीने खरेदी केलेल्या जमिनीचे 7/12 पत्रकातील मुळ मालकांने घेतलेल्या कर्जाचा बोजा कमी करणे व मालकी हक्कामध्ये श्रीमती वंदना यांचे नाव नोंद करून नवीन 7/12 उतारा देणेसाठी रुपये 5000/- लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारली असता त्यांना अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडलेने त्यांचेविरुध्द माझी फिर्याद आहे. समक्ष ( विठ्ठल आबा खुटाळे ) रा.डोणोली ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): manohar balwant ranmale(I (Inspector)) / psmh23285 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा): Pakbutuk

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Vinod Thul DM19
ठाणे अमलदार
शाहूवाडी पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): manohar balwant ranmale

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): psmh23285